17 APR 2024 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# न्यू कॉलेजतर्फे विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्तीचे वितरण

## योजना पुन्हा सुरू; प्रत्येक वर्गातील तिघांची निवड



कोल्हापूर : न्यू कॉलेजमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते गुणवत्ता शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात आले. यावेळी आर. डी. ढमकले, व्ही. एम. पाटील, विनय पाटील आदी उपस्थित होते.

कोल्हापूर, ता. १६ : न्यू कॉलेजने गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना यंदा पुन्हा सुरू केली आहे. याअंतर्गत कॉलेजमधील इयत्ता अकरावी ते एम. ए. अभ्यासक्रमाच्या वर्गात प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीचा लाभ दिला जातो. त्यानुसार एकूण ८६ विद्यार्थ्यांना वर्षभरासाठी ६०० रुपये इतकी गुणवत्ता शिष्यवृत्ती देण्यात आली.

श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संस्थेच्या सभागृहात या शिष्यवृत्तीचे वितरण शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते वितरित करण्यात आले. अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक विनय पाटील होते. आपण आजन्म विद्यार्थी असावे. नेहमी अलौकिक कार्य करण्याची संधी शोधावी. स्वतःचे तत्त्वज्ञान निर्माण करावे. श्रम आणि नैतिकता ही चिरंतन टिकणारी मूल्ये असून विद्यार्थ्यांनी त्यावर विश्वास ठेवून कार्य करावे, असे आवाहन डॉ. शिंदे यांनी केले.

आयुष्यात कठोर परिश्रमाशिवाय यश संपादन करता येत नसल्याचे विनय पाटील यांनी सांगितले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. के. जी. पाटील, संचालक डॉ. पी. के. पाटील, पर्यवेक्षक डॉ. एस. जी. जगताप, सुशील चव्हाण, एम. आर. राजमाने उपस्थित होते. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी स्वागत केले. उपप्राचार्य डॉ. आर. डी. ढमकले यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. एम. ए. नायकवडी यांनी सूत्रसंचालन केले. उपप्राचार्य एस. एन. इनामदार यांनी आभार मानले.

17 APR 2024 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मॉरिशस सांस्कृतिक मंडळाकडून महाराष्ट्रातील परंपरांचे संवर्धन

## अर्जुन पुतळाजी : 'शिविम' संशोधन पत्रिकेचे प्रकाशन

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १६ : महाराष्ट्रातील लोककला व परंपरांचे मॉरिशस सांस्कृतिक मंडळ चांगल्या प्रकारे संवर्धन करत आहेत, असे प्रतिपादन मंडळाचे प्रमुख अर्जुन पुतळाजी यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ व महावीर महाविद्यालयातर्फे मॉरिशसमधील मराठी सांस्कृतिक मंडळ आणि मराठी मंडळाच्या 'शिविम' संशोधन पत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. दरम्यान, यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे अध्यक्षस्थानी होते. महावीर महाविद्यालयात कार्यक्रम झाला. या वेळी डॉ. लोखंडे यांनी मॉरिशसमधील मराठी विद्यार्थ्यांना महावीरमध्ये मराठीचे शिक्षण घेण्यासाठी प्रवेश खुला असल्याचे सांगितले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ व महावीर महाविद्यालयातर्फे मॉरिशसमधील मराठी सांस्कृतिक मंडळ आणि मराठी मंडळाच्या शिविम संशोधन पत्रिकेच्या प्रकाशन प्रसंगी अर्जुन पुतळाजी, डॉ. राजेंद्र लोखंडे, नितीन बापू, शिवकुमार सोनाळकर, प्रा. डॉ. अनिल गवळी, डॉ. शरद गायकवाड, डॉ. गोमटेश्वर पाटील, प्रा. जयवंत दळवी, डॉ. मानतेश हिरेमठ आदी.

डॉ. शरद गायकवाड यांनी महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याची माहिती दिली. मराठी मंडळाचे अध्यक्ष नितीन बापू, 'शिविम'चे अध्यक्ष शिवकुमार सोनाळकर, प्रा. डॉ. अनिल गवळी यांनी मनोगत व्यक्त केले. मराठी भाषा, साहित्य व महाराष्ट्रातील लोककलांचे संवर्धन होण्याविषयी कलाकारांशी चर्चा करण्यात आली. मॉरिशसमधील मराठी भाषिक पंचवीस कलाकारांनी कार्यक्रमात सहभाग घेतला. प्रा. जयवंत दळवी यांनी संयोजन केले. शिविमचे अध्यक्ष भरत जाधव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी आभार मानले. डॉ. मानतेश हिरेमठ यांनी सूत्रसंचालन केले.